वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार- रविवार दि.२ नोव्हेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# ऐन निवडणुकीच्या तोंडावर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीची लंका उध्वस्त करण्याचा आ.जगतापांचा जोरदार प्रयत्न

# राष्ट्रवादी पक्षाचा निवडणूकीत मोठा संग्राम होणार



आ.जगतापांना जातीयवादी करण्याची रसद कोणाकडून मिळतेय.. ज्यावरून ते मुस्लिम समाजावर जोरदार हल्ले करताहेत

Email:- dailydivyawarta@Gmail.com

दिव्य वार्ता

Email:-editordivyawarta@gmail.com

**राष्ट्रवादीकडून उभे राहणाऱ्यांनो जरा विचार करूनच उभे रहा**

अहमदनगर, (दिव्य न्युज):- राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या शिलेदार आमदार संग्राम जगताप दुखवट्यातून सावरले असून, पुन्हा हिंदुत्वाचा हुंकार भरण्याची तयारी सुरू केली आहे.राष्ट्रवादी काँग्रेसची भूमिका ही माझी जबाबदारी आहे, तर हिंदुत्व हे माझे कर्तव्य आहे. त्यामुळ जबाबदारी आणि भूमिका दोन्ही पार पडेल, असे सांगून पुन्हा हिंदुत्वाचा हुंकार भरण्याची तयारीत असल्याचे संकेत दिले. ▶▶ पान २ वर

# प्रदेशाध्यक्ष नाझेर काझी यांनी उगरला बेकायदेशीर कारवाईचा बडगा

## माहिती न घेता चक्क अल्पसंख्यांक जिल्हा कार्यकारणी बरखास्त

### बैठकीचे ते बॅनर ठरले जिल्हाध्यक्षांचा उपस्थित न राहण्याचे कारण, बीडच्या अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्षपदी शेख निजाम यांची निवड होण्याची शक्यता





हेच ते मिठाचा खडा टाकणारे बॅनर

**कार्यकारणी बरखास्त झाल्याच्या नाराजीने शेख इकबाल धरणार वेगळा मार्ग**

बीड, (दिव्य न्युज):- आज बीडमध्ये अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अल्पसंख्यांक विभागाचे प्रदेशाध्यक्ष नाझेर काझी यांनीच जिल्हाध्यक्षांना विश्वासात न घेता बेकायदेशीर बैठक घेवून त्यामध्ये कार्यकारणी बरखास्तगिचा बेकायदेशीर बडगा उगारल्याची कुजबुज जिल्हाभरात होत आहे. खरं तर प्रदेशाध्यक्षांनी प्रथम जिल्हाध्यक्षांना आपला नियोजित दौरा देणे गरजेचे होते. जिल्हाध्यक्षालाच बैठक लावण्याचे आदेश प्रदेशाध्यक्षांनी देणे अनिवार्य असतांना



जिल्हाध्यक्षांना कल्पना किंवा माहिती न देता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या दुसऱ्या गटाला बैठक आयोजित करण्याचे आदेश दिले. त्या बैठक आयोजित करणाऱ्या गटानी बैठकीचे बॅनर सोशल मिडीयावर टाकले त्यामध्ये विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह जिल्हाध्यक्ष शेख एकबाल यांचे फोटो नाहीत... याच बॅनरमुळे या बैठकीत नाराजीला सुरूवात झाली आणि चक्क प्रदेशाध्यक्षांनी मागचा पुढचा कोणताच विचार न करता बेकायदेशीर बैठकीत बेकायदेशीर निर्णय घेत कार्यकारणी बरखास्त केल्याची जोरदार चर्चा जिल्हाभरात होत असून कार्यकारणी बरखास्त झाल्याच्या नाराजीने शेख ▶▶ पान २ वर

# अक्रम बागवान यांची नगरसेवकपदाची होणार हॅट्रीक

## मोठा जनसंपर्क, प्रत्येकांशी मैत्रीपुर्ण संबंध येणार अक्रम बागवानच्या कामी

### आपल्या नगरसेवक पदाच्या कार्यकाळात प्रभागात दर्जेदार सिमेंट नाल्या आणि नवीन पाईपलाईनसह इतर कामे पूर्ण



बीड, (दिव्य न्युज):- बीड नगर पालिकेच्या निवडणुकीची घोषणा या आठवड्यात होणार असून डिसेंबरमध्ये नगर पालिकेची निवडणूक पार पाडली जाणार आहे. प्रभाग क्र. १६ अ मधून आता अक्रम बागवान हे नगरसेवक पदाची हॅट्रीक करणार असुन प्रभाग क्रं. १६ मध्ये ते तिसऱ्यांदा निवडणुकीच्या मैदानात पुर्ण ताकदीने फारूक पटेल यांच्या सोबतीने उतरणार आहेत. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून अक्रम बागवान हे उमेदवार असणार आहेत. अक्रम बागवान यांचा ▶▶ पान २ वर

# भाजप अल्पसंख्यांक मोर्चाच्या वतीने हसीन अख्तर यांचा सत्कार

## अख्तर यांच्या माध्यमातून राज्य सरकारकडून बीड जिल्ह्याचा सन्मान - सलीम जहाँगीर



बीड,(दिव्य न्युज):- महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीवर बीड येथील उर्दू साहित्याचे अभ्यासक सय्यद हसीन अख्तर यांची कार्याध्यक्ष म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल भाजप अल्पसंख्यांक मोर्चाच्या वतीने प्रदेश महामंत्री सलीम जहाँगीर यांनी त्यांचा सत्कार केला. राज्य शासनाने हसीन ▶▶ पान २ वर

# जलील लाला प्रभाग ६ मधून सहाव्यांदा निवडणूकीच्या रिंगणात



## प्रभागात जलील लालांचा दांडगा जनसंपर्क, प्रत्येक मतदारांशी जवळचे संबंध

बीड, (दिव्य न्युज):- बीड नगर पालिकेतील जेष्ठ नगरसेवक म्हणुन असलेले जलील लाला हे प्रभाग क्रं. ६ मधील सहाव्यांदा निवडणूकीच्या रिंगणात पुर्ण ताकदीने उतरणार आहेत. आ.संदीप क्षीरसागर व माजी आ. सय्यद सलीम यांचे अत्यंत विश्वासू आणि जवळचे असलेले जलील ▶▶ पान २ वर

# साहेबांच्या होमग्राऊंडवर सतिष शेळके जि.प.चा खेळ खेळणार

## त्यांच्या पोस्टवर देवी देवतेंच्या सोबत महापूरूषांचे फोटो टाकून आमचे ठरल्याची पोस्टर करत मतदानरूपी आशिर्वाद द्याव्याची भावनीक पोस्ट



बीड, (दिव्य न्युज):- बीडचे आ.संदीप क्षीरसागर यांचे जवळचे आणि अत्यंत विश्वासू असलेले सेवी सहाय्यक सतीश शेळके हे निवडणूकीच्या मैदानात उतरणार आहेत. साहेबांच्या होमगाऊंडवर सतिश शेळके जिल्हा परिषद निवडणूकीचा खेळ खेळणार असून ते त्यांच्या पत्नीला नवगण राजुरी सर्कलमधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून उभे करणार असल्याची पोस्ट त्यांनी सोशल मिडीयावर टाकली आहे. त्या पोस्टवर देवी देवतेंच्या फोटो सोबत महापुरूषांचेही फोटो टाकून आमचं ठरल्याची पोस्ट करत मतदारांना त्यांनी मतदान रूपी आशिर्वाद द्यावे अशी भावनिक पोस्ट करून खळबळ उडवून दिली आहे.

येणाऱ्या काही दिवसात राज्यात नगर पालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूकीचे बिगूल वाजणार आहे. आरक्षण ठरलं, मतदार यादी पूर्ण झाली आता फक्त निवडणूक आयोगाकडून निवडणूकीच्या तारीख घोषीत होणे बाकी आहे. मिळालेल्या माहितीनुसार या ▶▶ पान २ वर



## बीड शहरात मानवतेचा संदेश

# जावेद कुरेशी ठरले गरजुंचे तारणहार





बीड,(दिव्य न्युज):- थंडीच्या कडाक्यात व पावसात थरथरणाऱ्या बेघर आणि गरजूंसाठी बीडचे समाजसेवक जावेद भैय्या कुरैशी हे तारणहार' ठरले आहेत. शहरातील जालना रोड, बार्शी नाका, बसस्थानक, रेल्वे स्टेशन आणि सुभाष रोड परिसरात फिरत त्यांनी तब्बल ७० बेघर, भिक्षुक, मानसिक रुग्ण आणि गरीब नागरिकांना शॉल, ब्लँकेट, चादरी, स्वेटर, कपडे, चप्पल आणि अन्नधान्य वाटप केले.

थंडीची चाहूल लागताच मानुसकी हीच खरी सेवा' या भावनेतून कुरैशी यांनी रस्त्यावर झोपणाऱ्या वंचितांना उबदारपणाचा आधार दिला. त्यांच्या हातून मदत मिळताच अनेकांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलले. अनेकांनी डोळ्यांत पाणी आणत त्यांच्या या मानवतावादी उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. जावेद भैय्या म्हणाले, समाजातील उपेक्षित घटकांपर्यंत मदत पोहोचवणे हेच माझे कर्तव्य आहे. थंडी असो वा उन्हाळा, गरजूंना आधार देणे हीच खरी मानवता आहे. या उपक्रमातून फक्त वस्तूंचे वाटप झाले नाही, तर मानसिक रुग्ण, वेडसर, एकटे पडलेले ज्येष्ठ नागरिक यांच्यापर्यंतही मायेचा हात पोहोचला. जावेद भैय्या स्वतः रस्त्यावर उतरून प्रत्येकाशी संवाद साधतात आणि त्यांच्या गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. या समाजकार्याने बीड शहरात एक वेगळा संदेश दिला आहे- मानवतेपेक्षा मोठं धर्म नाही!' जावेद भैय्या कुरैशी यांच्या या कार्यातून अनेक तरुणांना प्रेरणा मिळाली असून, शहरात सामाजिक ऐक्याची नवी उमेद जागी झाली आहे.

## बीडमधील प्रभाग १९ आणि २२ मधील प्रकार

# एका प्रभागातील नावे दुसऱ्या प्रभागात घुसडली

### स्थळ पाहणीत उघड होवूनही बदल न केल्याने आत्मदहनाचा इशारा

बीड ,(दिव्य न्युज):- बीड नगर पालिकेच्या प्रारुप मतदार यादीमध्ये प्रभाग क्र. १९ चे रहिवाशी असलेल्या लोकांची नावे प्रभाग क्र. २२ मध्ये दिसून येत असल्याने वारंवार अर्ज करुन आणि स्थळ पाहणीत देखील हेस्पष्ट झाले. तरीही त्यात बदल करून अंतिम मतदार यादीत त्या नावांचा समावेश सुधारित प्रभागात न केल्याने शोएब इनामदार व इतरांनी निवेदनाद्वारे आत्मदहन करण्याचा इशारा दिल्याने खळबळ उडाली आहे.

बीड शहरातील शोएबुद्दीन बाफियादिन इनामदार (रा. दाऊदपूरा नगर पालिकेला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, प्रारुप व प्रसिध्दी (अंतिम) यादीमध्ये प्रचंड घोळ असल्याने आम्ही दि. ३ नोव्हेंबर २०२५ रोजी नगर परिषद कार्यालयासमोर आत्मदहन करणार आहोत. मतदान यादीमध्ये झालेला घोळ तात्काळ दुरुस्त करून घ्यावा अन्यथा आमच्या जिवाची हानी झाल्यास प्रशासन जबाबदार राहील, प्रारुप मतदार यादीमध्ये प्रभाग क्र. १९ चे रहिवाशी असलेले लोकांची नावे प्रभाग क्र. २२ मध्ये दिसून येत असल्याने आम्ही वारंवार शासनाला अर्ज करुन सुध्दा त्या अर्जावर कसल्याही प्रकारची कार्यवाही किंवा आमचे समाधान झालेले नाही. कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे व राजकीय दबावापोटी मी दिलेले ७३१ मतदार नावे हे प्रभाग क्र. २२ मधून १९ मध्ये येणे अपेक्षित होते. तरीही त्यांच्या मधले बरेच नावे न आल्यामुळे आम्ही नगर परिषद कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा निर्णय घेतलेला आहे. आमच्या जिवीताचे काही बरेवाईट



झाल्यास त्यास आपले प्रशासन पुर्णतः जबाबदार राहील असे निवेदनात शोएब इनामदार यांनी म्हटले आहे.

## महिलांच्या कष्टाच्या पैशावर 'डाका'!

# बचत गटांचे १६ लाख रुपये क्षेत्रीय अधिकाऱ्यानेच हडपले

केज ,(दिव्य न्युज):- महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांना अल्प व्याजदराने कर्ज देणाऱ्या एका फायनान्स कंपनीतील क्षेत्रीय अधिकाऱ्यानेच महिला बचत गटांकडून वसूल केलेल्या कर्जाच्या रकमेत मोठा अपहार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. आरोपी अधिकाऱ्याने ७९ महिलांकडून १६ लाखांहून अधिक रक्कम वसूल करून ती कंपनीच्या खात्यावर जमा केलीच नाही.

केज येथील भारत फायनान्शियल इनक्लूयूजन लि. या कंपनीच्या शाखेत अरबाज रशीदखाँ पठाण (वय २७, रा. अजीजपुरा, केज) हा क्षेत्रीय अधिकारी म्हणून कार्यरत होता. त्याने २३ ऑगस्ट २०२३ ते ३ मे २०२४ या कालावधीत केज तालुक्यातील महिला बचत गटांना दिलेल्या कर्जाची परतफेड म्हणून ७९ महिलांकडून हप्त्यापोटी एकूण १६ लाख ९ हजार ८६३ एवढी रक्कम रोख स्वरूपात जमा केली. मात्र, जमा केलेली ही रक्कम अरबाज पठाणने कंपनीच्या खात्यावर जमा न करता स्वतःच्या फायद्यासाठी वापरल्याचे कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले.

महिला बचत गट अत्यंत विश्वासाने आणि कष्टाने गोळा केलेले हप्ते वेळेवर भरत असताना, अरबाज पठाणने मात्र या पैशांचा अपहार करून कंपनीची फसवणूक केली. केज येथील कंपनीचे शाखाधिकारी श्रीहरी मुळे यांनी बुधवारी (२९) केज पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. फिर्यादीवरून, क्षेत्रीय अधिकारी अरबाज रशीदखाँ पठाण याच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा (कलम ४०६, ४२०) नोंद करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे हे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. या अपहारामुळे अल्पबचत गटातील महिलांना भविष्यात कर्ज मिळण्यात अडचणी येण्याची भीती व्यक्त होत आहे.

पान ४ वरून

## जिल्हाधिकारी साहेब

करणे गरजेचे असून ग्रामसेवक सह सरपंच, उपसरपंच आणि ग्रामसेवक सदस्यांचे नजर फक्त आलेल्या निधीवर असते बाकी त्यांना काहीही घेणे देणे नाही मिळालेल्या माहितीनुसार कोणत्या तरी अधिकारी व ठेकेदारांनी नुकताच सर्व ग्रामपंचायत सदस्यांचे खिसे ४० ते ५० हजारांनी गरम केले असून फोन पे वर टाकून सदस्यांना खुश करण्यात आल्याची माहिती आहे असल्या बेजाबदार लोकांवर जिल्हाधिकारी यांनी कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

## चकलंबा पोलीस

चकलंबा पोलीस स्टेशन चे एपीआय संदीप पाटील यांना संपूर्ण माहिती असतानाही खोट्या गुन्ह्याची नोंद घेतली

एसपी कॉवत साहेब असे जर माहिती असतानाही तुमचे पोलीस कर्मचारी चोरीचे खोटे गुन्हे नोंद करीत असतील तर गरिबांनी न्यायाची अपेक्षा कोणापासून करायची ?

जावेद सय्यद अन्य चार जणांना गंभीर जखमी होवुस्तर आठ जणांनी मारले १९ ऑक्टोबर ला सकाळी ८ :१५ वा.मग या हाणामारीत त्यांच्यावर कलम ११८(२) हा गुन्हा नोंद झाला. मग हा रोष मनात धरून या गुन्ह्यातील आरोपींनी दोन दिवसापूर्वीची म्हणजेच १७ऑक्टोबर सकाळी ८वा. चोरी केली म्हणून खोटी केस दि.२५ऑक्टोबर तब्बल आठ दिवसांनंतर चकलांबा पोलीस स्टेशन येथे दाखल केली.

## स्थानिक स्वराज्य

दिलासा देण्यात आला होता. मात्र, प्रत्यक्षात सध्य परिस्थिती आता पूर्णपणे बदललेली दिसत असल्यानी त्या गावपुढाऱ्यांनी देखील दंड थोपटीत मैदानात उतरण्याची तयारी दर्शवली असली, तरी त्यांची खरी कसोटी आता लागणार आहे. जनतेत सेवा, प्रामाणिकता आणि कार्यक्षमता यांचा ठसा उमटवणाऱ्या उमेदवारालाच मतदार पसंती देतील पण 'छात्यात दम नाही, उगाच पिळतो मिशाला' या दादा कोंडके यांच्या प्रसिद्ध गाण्यागत फुसकाऱ्या मारणाऱ्या इच्छुक उमेवारांच्या दाव्यांवर मतदारांचा विश्वास राहिलेला नसल्याने गटात आणि गणात कितीही आटापिट केली, तरी मतदारांच्या मनात उमेदवार आधीच ठरलेला आहे, अशी चर्चा आता सर्वत्र रंगत असुन जनतेच्या मनातील तो खरा उमेदवार कोण? याचे उत्तर येणाऱ्या निवडणुकीच्या निकालानंतरच स्पष्ट होणार आहे.

पान १ वरून

## राष्ट्रवादी पक्षाचा

अहमदनगर जिल्हा रुग्णालयातील अत्याधुनिक कार्डियाक कॅथलॅब युनिटचे लोकार्पण भाजपचे माजी खासदार सुजय विखे आणि आमदार संग्राम जगताप यांच्या उपस्थित झाले. आमदार जगताप यांनी यावेळी माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी हिंदुत्वाच्या मुद्यावर भूमिका मांडली.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा छत्रपती शिवाजी महाराज-फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारधारेवर कार्य करतो. सर्वसमावेशक अशी भूमिका असताना, हिंदुत्वाची वेगळी भूमिका स्वीकारल्यावरून अजित पवार यांनी आमदार जगताप यांना काय सल्ला दिला, याकडे लक्ष वेधल्यावर आमदार जगताप यांनी भूमिका मांडली.'पक्षाच्या भूमिकेसंदर्भात मतदारसंघातील मतदारांनीा माझ्यावर जबाबदारी दिली, निवडून दिले. ते मी पार पाडत आहे. परंतु हिंदुत्व माझे कर्तव्या आहे. तेही मी पार पाडतो आहे. मतदारांनी टाकलेली जबाबदारी आणि मी स्वीकारलेले कर्तव्य दोन्ही मला पार पाडायचे आहे,' असे आमदार जगताप यांनी म्हटले.

संग्राम जगताप यांनी मतदार यादीतील घोळावर देखील प्रतिक्रिया दिली. अहिल्यानगर शहर मतदारसंघातील यादीत अनेक बांगलादेशींची नावे आहेत. अनेक बांगलादेशी अहिल्यानगमध्ये आढळले आहेत. त्यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल झालेले आहेत, अटकही झाली आहेत. परंतु मुळाशी जावून पोलिसांनी तपास केलेला नाही, असे आरोप केला.अहिल्यानगर शहरातील बांगलादेशींचा सोक्षमोक्ष लावला पाहिजे. लोकसभा निवडणुकीवेळी जी मतदार यादी होती, तिच विधानसभा निवडणुकीवेळी होती. परंतु पराभूत झाले की, मतदार यादीत घोळ आणि मतदान यंत्रात दोष, अशी ओरड केली जाते, असा चिमटा देखील संग्राम जगताप यांनी विरोधकांना काढला.

## प्रदेशाध्यक्ष नाझेर

इकबाल हे वेगळ्या मार्गावर जाणार असल्याची जोरदार चर्चा शहरात होत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की आज बीडच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा कार्यालयात प्रदेशाध्यक्ष नाझेर काझी यांनी एका बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीला ते संबोधित करतांना चांगलेच भडकले. बीड अल्पसंख्यांक कार्यकारणी कर्तव्यदक्ष नसल्याचे कारण देत त्यांनी कठोर पाऊल उचलत जिल्हा कार्यकारणी बरखास्त करून पुर्णःबांधणी सुरू केल्याचे जाहिर केले. जिल्हाध्यक्ष इकबाल भाई गैर हजर राहिल्याने ही कार्यकारणी बरखास्तीचा प्रस्ताव त्या बैठकीत मांडण्यात आला आणि कार्यकारणी बरखास्त करण्यात आली. त्याच ठिकाणी प्रदेशाध्यक्षांनी नवीन कार्यकारणीसाठी नावे ही मागविले. त्यांनी प्रथम जिल्हाध्यक्षांना या बैठकीला का उपस्थित राहिले नाही? याची विचारणा करणे गरजेचे असतांना त्यांनी तसे न करता त्यांचे म्हणणे न ऐकता त्यांना कोणतीच संधी न देता तडकाफडकी हा चुकीचा निर्णय घेतल्याची चर्चा जिल्हाभरात होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील एका गटाने स्वतः ला जिल्हाध्यक्षपद मिळावे यासाठी कट कारस्थान रचण्यास सुरूवात केली होती. स्वतःला जिल्हाध्यक्षपद मिळावे याच साठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हाध्यक्षांना याची कोणतीच माहिती या गटानी दिली नाही. खरं तर प्रदेशाध्यक्षांनी प्रदेशाच्या दौरा आयोजित केला तेव्हाच सर्व जिल्हाध्यक्षांना याची माहिती देणे गरजेचे होते. कोणत्या तारखेला बैठक होणार कुठे होणार, याची सपुर्ण माहिती प्रदेशाध्यक्षांनी जिल्हाध्यक्षांकडून घेणे अनिवार्य असते. त्यांनी असे न करता दुसऱ्या गटाकडून बैठक आयोजित करायला लावत जिल्ह्यातील कार्यकारणी बरखास्त केल्याने कार्यकर्त्यांमध्ये संताप व्यक्त करण्यात येत आहे. याची तत्काल माहिती जिल्हाध्यक्षांसह सर्वांनी पक्षाध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनित तटकरे यांना दिली आहे.

## अक्रम बागवान यांची

प्रभागात मोठा जनसंपर्क असून प्रत्येकाशी मैत्रीपुर्ण संबधामुळे त्यांची नगरसेवक पदाची हॅट्रीक होणार असल्याचे वातावरण प्रभागात दिसून येत आहे.

नगरसेवक पदाच्या कार्यकाळात अक्रम बागवान यांनी संपूर्ण प्रभागात दर्जेदार सिमेंट रस्ते, सीसी नाली, नवीन पाईपलाईन, स्ट्रीट लाईट, मोठे नाल्यांचे काम पूर्ण केले आहेत. प्रभागात पाच ते सहा ठिकाणी नवीन बोअर घेण्यात आले. त्यावर सर्मशिबल पंप बसविण्यात आल्याने नागरीकांना पाण्याची कोणतीच समस्या प्रभागात नाही. चांगल्या आणि दर्जेदार कामांमुळे अक्रम बागवान याही निवडणूकीत आपली हॅट्रीक पुर्ण करणार असून राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून ते उमेदवार असणार आहेत. त्यांच्या सोबतीला फारूक पटेल हे मागील निवडणुकीप्रमाणेच सोबत राहणार असल्याचे अक्रम बागवान यांची ताकद या प्रभागात मोठी आहे. प्रत्येकांच्या कामी येणारे, सुख दुःखात सोबत राहणारे आणि प्रभागात मैत्रीपूर्ण संबंध असणारे म्हणुन अक्रम बागवान यांची ओळख आहे. निवडणूकीची घोषणा होताच ते हॅट्रीकसाठी तयार राहणार असून प्रभागातील मतदार ही त्यांची या नगरसेवक पदाची हॅट्रीक पूर्ण करणार असल्याचे वातावरण प्रभागात दिसून येत आहे.

## साहेबांच्या होमग्राऊंडवर

आठवड्यात निवडणूक आयोग निवडणूकीचा कार्यक्रम घोषीत करणार आहे. अशातच काल बीडचे आ.संदीप क्षीरसागर यांचे सेवी सहाय्यक सतीष शेळके यांनी सोशल मिडीयावर आमचं ठरलं ची पोस्ट टाकून एकच खळबळ उडवून दिली आहे. संदीप क्षीरसागर यांचा होम ग्राऊंड म्हणजे नवगण राजुरी आहे. आमदार होण्यापुर्वी संदीप क्षीरसागर हे याच नवगण राजुरीतून दोनदा जि.प. सदस्य झालेले आहेत. त्यापुर्वी संदीप क्षीरसागर यांचे वडील रविंद्र क्षीरसागर हे त्या सर्कलचे जि.प. सदस्य होते. आता होणाऱ्या निवडणूकीत चक्क संदीप क्षीरसागर यांच्या पीए ने पोस्ट टाकून अनेकांचा आश्चर्याचा धक्काच दिला आहे. सतिष शेळके म्हणजे आमदारांचे राईट हॅण्ड... सर्व कार्यालयीन कामकाज सतिष शेळके हेच सांभाळतात. सतिष शेळकेंवर आ.संदीप क्षीरसागरांचा विश्वास असून ते क्षीरसागरांचे मोठ्या विश्वासू आहेत. आता येणाऱ्या काही दिवसात याचे चित्र खुले होणार आहे. संदीप क्षीरसागर हे सतिष शेळके यांच्या पत्नीला या सर्कलमधून उमेदवार देतात का? या कडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

## भाजप अल्पसंख्यांक

घेत केलेली नियुक्ती ही बीड जिल्ह्यासाठी आणि अल्पसंख्यांक समाजासाठी गौरवाची बाब असल्याचे सलीम जहाँगीर यांनी म्हटले आहे. हसीन अख्तर यांनी उर्दू भाषेच्या विकासासाठी मोठे प्रयत्न केलेले आहेत. उर्दू भाषेसाठी त्यांनी दिलेले योगदान महत्वाचे असून त्याचीच दखल घेत राज्य सरकारने त्यांच्यावर कार्याध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवली आहे. या पदाच्या माध्यमातून ते यापुढे अधिक वेगाने उर्दू भाषेचा विकास , प्रसार आणि प्रचार करून कार्याची व्याप्ती वाढवतील अशी अपेक्षा भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश महामंत्री सलीम जहाँगीर यांनी व्यक्त केली. यावेळी नूर लाला खान, सरफराज शेख, रफिक कुरेशी, आमु सय्यद, सलीम आतार, अमजद सय्यद, आमेर शेख आदींची उपस्थिती होती.

## जलील लाला प्रभाग

लाला यांना उमेदवारी मिळणार असून ते प्रभाग क्रं. ६ मधून सहाव्यांदा निवडणुकीत उतरून सहाव्यांदा विजयाचा गुलाला उधाळणार आहेत. आपल्या नगरसेवक पदाच्या कार्यकाळात प्रभागात केलेल्या विकास कामांच्या बळावर त्यांना ही निवडणूक अत्यंत सोपी जाणार आहे. प्रभागात त्यांचा मोठा जनसंपर्क असून प्रत्येक मतदारांशी त्यांचे जवळचे संबंध आहेत. नेहमी सर्वांच्या कामी येणारे म्हणुन जलील लाला यांची ओळख आहे. प्रभागात स्वच्छतेच्या कामांवर त्यांचा जास्त लक्ष असते. प्रभागात नळाला पाणी वेळेवर येते अनेक ठिकाणी सिमेंट रस्ते, नाल्यांची कामे जलील लाला यांनी पुर्ण केली आहे. प्रभागात सर्वच ठिकाणी विद्युत कामे पूर्ण झालेली आहेत. अशा या दर्जेदार कामे करणाऱ्या जलील लालावर प्रभागातील मतदार सहाव्यांदा विश्वास टाकणार असून प्रभागात जलील लालाच्या रूपाने तुतारीचा जोरदार आवाज गुंजणार असून जलील लाला विजयाचा गुलाल सहाव्यांदा उधळणार आहेत.